MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Dist.Co.Ltd
(A Govt. of Maharashtra Undertaking)
CIN : U40109MH2005SGC153645
E-mail :cgmp@mahadiscom.in
Website :www.mahadiscom.in

HRD/O&M/F.No.903/**20923**
Maharashtra State Electricity Distribution Co.Ltd.
Estrella Batteries Expansion Building,
Ground Floor, Plot No. 1, Dharavi Road
Matunga, Mumbai – 400 019.
Telephone No. : 022-24077441
Fax No. : 022-24025763

**Date : 26/07/2019**

# CIRCULAR

**Sub : Grant of additional two increments to employees working in Technical categories ----- Clarification thereof.**

Ref.: 1) G.O. No. 166 (P) Dt. 21/07/2005.
2) Circular No. GAD/O&M/F.N. 903/27487 Dt. 30/08/2010.
3) Circular No. GAD/O&M/F.N. 903/05341 Dt. 15/02/2014.

The MSEBHCL under Board Resolution No. 587 Dt. 16.05.2005 had accorded approval to grant Additional TWO Increments in lieu of the separate wage structure considering the nature of duties and other cogent factors to the technical employee working in DISCOM, GENCO, TRANSCO & Holding Company (erstwhile MSEB) in the categories mentioned in the Annexure to General Order no. 166 (P) Dt. 21/07/2005.

2. Subsequently, various queries were raised by field offices regarding grant of additional increments to the departmental employees appointed under direct recruitment. To clarify these queries Circular no. GAD/O&M/F.N.903/27487 Dt. 30/08/2010 was issued. The instructions were not to grant additional two increments to the departmental employee appointed under direct requirement as they have been already granted additional two increments on earlier occasion.

3. Later, vide Circular No. GAD/O&M/F.N. 903/05341 Dt. 15/02/2014, it was clarified that the technical employees appointed under direct recruitment to other technical post i.e. from pay group IV to pay group III where the provisions of G.O. 166 (P) Dt. 21/07/2005 are applicable, may opt for withdrawal of the benefit of additional two increments granted on earlier occasion and shall be granted additional two increments on appointment under direct recruitment to any of the posts shown in Annexure enclosed to G.O. 166 (P) Dt. 21/07/2005.

4. Now, in light of anomaly observed while fixing the pay of departmental technical employee on appointment under direct recruitment and withdrawal of additional two increments granted on earlier occasion and granting benefit of additional two increments in new posts as per the option exercised by the employee, the issue was once again examined in detail and is considered for further clarification.

5. Therefore, the Chairman and Managing Director in consultation with Director (Finance), Director (Operations), Director (Commercial), Director (Projects) and Director (HR) has accorded approval to issue clarification as follows:-

(a) While fixing the pay of an employee appointed under direct recruitment / internal notification, the benefit of additional two increments granted on earlier occasion **should be withdrawn only for the purpose of pay fixation and not for recovery**. No recovery is to be made in this regards as the employee has rendered services on that post.

(b) After withdrawal of two increments granted on earlier occasion the pay shall be fixed as per MSEDCL Service Regulation in newly appointed post.

(c) Additional Two increments will then be granted after the pay is fixed as mention in the newly appointed post as mentioned in (b) above.

(d) The Pay Group IV employees appointed under direct recruitment / internal notification to Pay Group III and who have been already granted HGB or Promoted within Pay Group IV Division-wise seniority; then the pay will be fixed as mention in (a), (b) & (c).

5. It may noted that, in case of any recovery done earlier in this regard, the same should be refunded to the concerned employee.

6. A few examples explaining the method of pay fixation as per above guidelines are given in Annexure 'A' attached hereto. The examples cited in Annexure 'A' are general in sense and the Authorities shall fix pay on case to case basis considering above clarification.

7. The other terms & conditions of the G.O. 166 (P) Dt. 21/07/2005 shall remain unchanged.

8. This circular is available on the Employee Portal (Mitra) / e- Library of the company.

**(Shivaji Indalkar)**
**Commander (Rtd.)**
**Chief General Manager (HR)**

**ANNEXURE - 'A'**

Examples showing pay fixation considering provisions of G.O. 166 (P) Dt. 21/07/2005 of departmental technical employee working in Pay Group IV – Technical Category who has been granted additional two increments and is appointed under direct recruitment in Pay Group III - Operator Category.

| SNO | Post | Pay Scale (ADM. Cir. 486 Dt. 30.06.2014) |
|---|---|---|
| 1 | Technician | 10050- 195- 11025- 235- 13375- 275- 19700 |
| 2 | Operator | 11275- 275- 12650- 370- 16350- 410- 28240 |

➢ **Example No. 01**: **Employee 'A'** has joined as Technician on dt. 02/04/2017. He got appointed to the post of Operator under direct recruitment and joined on dt. 05/03/2018. Then his Pay will be fixed as follows:-

| SNo. | Details | Basic Pay in Rs |
|---|---|---|
| 01 | Basic Pay fixed as on Dt. 02/04/2017 in the post of Technician | 10050 |
| 02 | **PLUS** Two additional increments as per G.O. 166 (P) Dt. 21/07/2005. ( Rs. 195 + 195 ) | 390 |
| **03** | **Basic Pay fixed in the post Technician as on dt.02/04/2017** | **10440** |
| 04 | As Technician 'A' has been appointed as Operator and joined on dt. 05/03/2018, his Basic pay as on 02/04/2017 will be re-fixed after withdrawal of Two additional increments given on earlier occasion in the post of Technician. | 10050 |
| 05 | After joining as Operator on dt.05/03/2018, his pay will be fixed in minimum pay in the post of Operator. | 11275 |
| 06 | **PLUS** Two additional increments as per G.O. 166 (P) Dt. 21/07/2005. (Rs. 275 + 275) | 550 |
| 07 | **Basic Pay to be fixed in the post of Operator as on dt. 05/03/2018.** | **11825** |

➢ **Example No. 02**: **Employee 'B'** has joined as Technician on dt.20/04/2013.He got appointed to the post of Operator under direct recruitment and joined on dt. 10/05/2018. Then his pay will be fixed as follows:-

| SNo. | Details | Basic Pay in Rs |
|---|---|---|
| 01 | Basic Pay fixed as on Dt. 20/04/2013 in the post of Technician. | 10050 |
| 02 | **PLUS** Two additional increments as per G.O. 166 (P) Dt. 21/07/2005. (Rs. 195 + 195). | 390 |
| 03 | Basic pay fixed on the post of Technician on Dt. 20/04/2013. | 10440 |
| **04** | **Current on-going Basic Pay as on 20/04/2018 after releasing regular increments.** | **11495** |
| 05 | As Technician 'B'has been appointed as Operator and joined on dt. 10/05/2018, his Basic pay as on 20/04/2013 will be re-fixed after withdrawal of Two additional increments given on earlier occasion in the post of Technician. | 10050 |
| 06 | After withdrawal of two additional increments, his Basic Pay as on 20/04/2018 in the post of Technician will be. | 11025 |
| 07 | After joining as Operator on dt.10/05/2018, his pay will be fixed in minimum pay in the post of Operator | 11275 |
| 08 | **PLUS** Two additional increments as per G.O. 166 (P) Dt. 21/07/2005. ( Rs. 275 + 275 ) | 550 |
| **09** | **Basic Pay to be fixed in the post of Operator as on dt.10/05/2018.** | **11825** |

➢ **Example No. 03: Employee 'C'** has joined as Technician on dt. 05/05/2008. He got appointed to the post of Operator under direct recruitment and joined on dt. 26/07/2018. Then his pay will be fixed as follows:-

| SNo. | Details | Basic Pay Rs/- |
|---|---|---|
| 01 | Basic Pay fixed as on Dt. 05/05/2008 in the post of Technician. (Old Pay Scale i.e. 01/04/2008 Pay revision) | 8040 |
| 02 | **PLUS** Two additional increments as per G.O. 166 (P) Dt. 21/07/2005. (Rs. 155 + 155). | 310 |
| 03 | Basic pay fixed on the post of Technician on Dt. 05/05/2008. | 8350 |
| 04 | Basic Pay fixed as on 31/03/2013 in the post of Technician in Pay Scale (Old Pay Scale i.e. 01/04/2008 Pay revision) | 9000 |
| 05 | Basic Pay fixed as on 01/04/2013 in the post of Technician in Pay Scale | 11260 |
| 06 | **Current on-going Basic Pay as on 05/05/2018 after releasing regular increments.** | **12670** |
| 07 | As Technician 'C'has been appointed as Operator and joined on dt.26/07/2018, his Basic pay as on 05/05/2008 will be re-fixed after withdrawal of Two additional increments given on earlier occasion in the post of Technician.(Old Pay Scale i.e. 01/04/2008 Pay revision) | 8040 |
| 08 | Basic Pay fixed as on 31/03/2013 in the post of Technician in Pay Scale (Old Pay Scale i.e. 01/04/2008 Pay revision) after withdrawal of two increments | 8660 |
| 09 | Basic Pay fixed as on 01/04/2013 in the post of Technician in Pay Scale after withdrawal of two increments | 10830 |
| 10 | After withdrawal of two additional increments,his Basic Pay as on 05/05/2018 in the post of Technician | 12200 |
| 11 | After joining as Operator on dt.26/07/2018, his pay will be fixed in minimum pay in the post of Operatoras **per 29 (a)** | 12375 |
| 12 | **PLUS** Two additional increments as per G.O. 166 (P) Dt. 21/07/2005. ( Rs. 275 + 370) | 645 |
| 13 | **Basic Pay to be fixed in the post of Operator as on dt.26/07/2018** | **13020** |

*****

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्सक्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र.मासं/रवका/न.क्र.९०३/ २०९२३
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉटनं.१,धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०००१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दिनांक : २६/०७/२०१९

# परिपत्रक

**विषय: तांत्रिक संवर्गामध्ये कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना दोन अतिरिक्त वेतनवाढी मंजूर करण्याबाबत - स्पष्टीकरण.**

**संदर्भ :** १) सा. आ. क्र. १६६ (क) दि. २१.०७.२००५.
२) परिपत्रक क्र साप्रवि/रवका/न.क्र.९०३/२७४८७ दि. ३०.०८.२०१०.
३) परिपत्रक क्र. साप्रवि/रवका/न.क्र.९०३/०५३४१ दि. १५.०२.२०१४.

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधारी कंपनी मार्फत पारीत करण्यात आलेल्या मंडळ ठराव क्र. ५८७ दि. १६.०५.२००५ अन्वये, महावितरण, महानिर्मिती, महापारेषण आणि सूत्रधारी कंपनी (तत्कालीन मरावि मंडळ) अंतर्गत कार्यरत असणाऱ्या आणि सा. आ. क्र. १६६ (क) दि. २१.०७.२००५ सोबतच्या जोडपत्रामध्ये नमूद केलेल्या तांत्रिक कर्मचाऱ्यांचे कामाचे स्वरूप आणि अनुषंगिक बाबी विचारात घेउन, त्यांना स्वतंत्र वेतन संरचना लागू करण्याऐवजी दोन अतिरिक्त वेतनवाढी देण्यास मंजुरी दिलेली होती.

२. तदनंतर, सरळसेवा भरती अंतर्गत नियुक्त करण्यात आलेल्या विभागीय कर्मचाऱ्यांना अतिरिक्त वेतनवाढी मंजूर करण्याच्या अनुषंगाने क्षेत्रिय कार्यालयाकडून मुद्दे उपस्थित करण्यात आले होते. याबाबत परिपत्रक क्र साप्रवि/रवका/न.क्र.९०३/२७४८७ दि. ३०.०८.२०१० अन्वये स्पष्टीकरण देण्यात आले होते. त्यानुसार, सरळसेवा भरती अंतर्गत नियुक्त करण्यात आलेल्या विभागीय कर्मचाऱ्यांना यापूर्वी दोन अतिरिक्त वेतनवाढी मंजूर करण्यात आल्या असल्याने पुन:श्च दोन अतिरिक्त वेतनवाढी मंजूर करू नयेत अशा सूचना देण्यात आल्या होत्या.

३. तदनंतर, परिपत्रक क्र. साप्रवि/रवका/न.क्र.९०३/०५३४१ दि. १५.०२.२०१४ अन्वये स्पष्ट करण्यात आले आहे की, सरळसेवा भरती अंतर्गत नियुक्त करण्यात आलेल्या तांत्रिक कर्मचाऱ्यांना, सा.आ. क्र. १६६ (क) दि. २१.०७.२००५ मधील तरतूदी लागू आहेत अशा अन्य तांत्रिक पदावर उदा. वेतनगट ४ मधून वेतनगट ३ मधील पदावर नियुक्त केल्यास, असे कर्मचारी यापूर्वी मंजूर करण्यात आलेल्या वेतनवाढी काढून घेण्याचा पर्याय स्विकारू शकतील, आणि सा.आ. क्र. १६६ (क) दि. २१.०७.२००५ मध्ये दर्शविण्यात आलेल्या अन्य पदावर नियुक्तीपश्चात दोन अतिरिक्त वेतनवाढी मिळण्यास पात्र असतील.

४. आता, सरळसेवा भरती अंतर्गत नियुक्त करण्यात आलेल्या विभागीय तांत्रिक कर्मचाऱ्यांना म्हणजेच ज्यांना सा.आ. क्र. १६६ (क) दि. २१.०७.२००५ मधील तरतूदीनुसार यापूर्वी अतिरिक्त वेतनवाढी मंजूर करण्यात आलेल्या आहेत, अशा कर्मचाऱ्यांनी पूर्वीच्या वेतनवाढी काढून घेण्याचा पर्याय स्विकारल्यानंतर त्यांना पुन:श्च दोन अतिरिक्त वेतनवाढी मंजूर करीत असतांना वेतननिश्चीतीवेळी निर्माण होणारी तफावत व इतर बाबींच्या अनुषंगाने स्पष्टीकरण देण्याच्या दृष्टीकोनातून या विषयी पुनश्च परिक्षण करण्यात आले.

५. सबब, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (वित्त), संचालक (संचलन), संचालक (वाणिज्य), संचालक (प्रकल्प) आणि संचालक (मासं) यांच्याशी विचारविनिमय करून, खालीलप्रमाणे स्पष्टीकरण निर्गमित करण्यास मंजुरी प्रदान केलेली आहे.

क) सरळसेवा भरती/ अंतर्गत अधिसूचनेव्दारे नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यास पूर्वी दिलेला **दोन अतिरिक्त वेतनवाढींचा लाभ हा केवळ वेतननिश्चीतीच्या उद्देशाने काढून घेण्यात यावा तथापी याबाबतची वसुली करण्यात येवू नये.** सदर कर्मचाऱ्याने त्या पदावर काम केले असल्याने अशा प्रकरणी वसुली करण्यात येणार नाही.

ख) पूर्वीच्या दोन वेतनवाढी काढून घेतल्यानंतर, मराविविकंम, कर्मचारी सेवाविनियमांनुसार नविन पदावर वेतननिश्चीती करण्यात येईल.

ग) वरील 'ख' नुसार नविन पदावर वेतननिश्चीती केल्यानंतर दोन अतिरिक्त वेतनवाढी मंजूर करण्यात येतील.

घ) वेतनगट ४ मधील कर्मचाऱ्याची सरळसेवा भरती/ अंतर्गत अधिसूचनेव्दारे वेतनगट ३ मध्ये नियुक्ती झाल्यास आणि सदर कर्मचाऱ्यास यापूर्वीच उच्च वेतनश्रेणीचा लाभ मंजूर केला असल्यास अथवा विभागस्तरीय सेवाज्येष्ठतेमध्ये वेतनगट ४ अंतर्गत पदोन्नती देण्यात आली असल्यास, अशा प्रकरणी वरील 'क', 'ख' आणि 'ग' मध्ये नमूद केल्यानुसार वेतननिश्चीती करण्यात येईल.

६. तसेच, यापूर्वी वसुली करण्यात आली असल्यास, सदरची रक्कम संबंधीत कर्मचाऱ्यास परत अदा करण्यात यावी.

७. वरील स्पष्टीकरण विचारात घेउन वेतननिश्चीतीबाबत कार्यपध्दती स्पष्ट करणारी काही उदाहरणे यासोबतच्या जोडपत्र 'क' मध्ये देण्यात आली आहेत. जोडपत्र 'क' मध्ये दर्शविण्यात आलेली उदाहरणे ही सर्वसामान्य स्वरूपात आहेत. यास्तव संबंधीत अधिकाऱ्यांनी वरील मार्गदर्शक सूचना विचारात घेउन प्रकरणपरत्वे वेतननिश्चीती करावी.

८. सा. आ. क्र. १६६ (क) दि. २१.०७.२००५ मधील इतर अटी व शर्ती अपरिवर्तीत राहतील.

९. सदर परिपत्रक कंपनीच्या Employee Portal (Mitra)/ e-Library वर उपलब्ध करण्यात आले आहे.

सोबत : जोडपत्र 'क'.

**(कमांडर शिवाजी इंदलकर)** (से.नि.)
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

## जोडपत्र 'क'

दोन अतिरिक्त वेतनवाढी मंजूर करण्यात आलेला वेतनगट ४ मधील विभागीय तांत्रिक कर्मचारी सरळसेवा भरती अंतर्गत वेतनगट ३ मधील - यंत्रचालक पदावर नियुक्त करण्यात आल्यास, अशा कर्मचाऱ्याची सा. आ. क्र. १६६ (क) दि. २१.०७.२००५ मधील तरतुदी विचारात घेउन वेतननिश्चीती करण्याबाबतची उदाहरणे.

| अक्र. | पद | वेतनश्रेणी (प्रशा. परि. ४८६ दि. ३०.०६.२०१४) |
|---|---|---|
| १ | तंत्रज्ञ | १००५०-१९५-११०२५-२३५-१३३७५-२७५-१९७०० |
| २ | यंत्रचालक | ११२७५-२७५-१२६५०-३७०-१६३५०-४१०-२८२४० |

➢ **उदाहरण १ : कर्मचारी 'अ'** हा तंत्रज्ञ म्हणून दि. ०२.०४.२०१७ रोजी सेवेत रूजू झाला आहे. तो यंत्रचालक पदी सरळसेवा भरती अंतर्गत नियुक्तीवर दि. ०५.०३.२०१८ रोजी रुजू झाल्यानंतर त्याची वेतननिश्चीती खालीलप्रमाणे करण्यात येईल.

| अ.क्र. | तपशिल | मूळवेतन रू. |
|---|---|---|
| १ | दि. ०२.०४.२०१७ रोजी तंत्रज्ञ पदावरील मूळवेतन | १००५० |
| २ | सा.आ. क्र. १६६ (क) दि. २१.०७.२००५ नुसार **अधिक** दोन अतिरिक्त वेतनवाढी (रू. १९५+१९५) | ३९० |
| ३ | **दि. ०२.०४.२०१७ रोजी तंत्रज्ञ पदावरील मूळवेतन** | **१०४४०** |
| ४ | तंत्रज्ञ 'अ' हा यंत्रचालक पदी नियुक्तीवर दि. ०५.०३.२०१८ रोजी रूजु झाल्यानंतर त्यास तंत्रज्ञ पदावर यापूर्वी दिलेल्या दोन अतिरिक्त वेतनवाढी काढून घेतल्यानंतर दि. ०२.०४.२०१७ रोजीचे मूळवेतन | १००५० |
| ५ | यंत्रचालक पदी दि. ०५.०३.२०१८ रोजी झाल्यानंतर यंत्रचालक पदाच्या सुरूवातीच्या टप्प्यावर निश्चीत होणारे मूळवेतन | ११२७५ |
| ६ | सा.आ. क्र. १६६ (क) दि. २१.०७.२००५ नुसार **अधिक** दोन अतिरिक्त वेतनवाढी (रू. २७५+२७५) | ५५० |
| ७ | **यंत्रचालक पदी दि. ०५.०३.२०१८ रोजी होणारी वेतननिश्चीती** | **११८२५** |

➢ **उदाहरण २ : कर्मचारी 'ब'** हा तंत्रज्ञ म्हणून दि. २०.०४.२०१३ रोजी सेवेत रूजू झाला आहे. तो यंत्रचालक पदी सरळसेवा भरती अंतर्गत नियुक्तीवर दि. १०.०५.२०१८ रोजी रुजू झाल्यानंतर त्याची वेतननिश्चीती खालीलप्रमाणे करण्यात येईल.

| अ.क्र. | तपशिल | मूळवेतन रू. |
|---|---|---|
| १ | दि. २०.०४.२०१३ रोजी तंत्रज्ञ पदावरील मूळवेतन | १००५० |
| २ | सा.आ. क्र. १६६ (क) दि. २१.०७.२००५ नुसार **अधिक** दोन अतिरिक्त वेतनवाढी (रू. १९५+१९५) | ३९० |
| ३ | दि. २०.०४.२०१३ रोजी तंत्रज्ञ पदावरील मूळवेतन | १०४४० |
| ४ | **नियमित वेतनवाढी मिळाल्यानंतर दि. २०.०४.२०१८ रोजीचे मूळवेतन** | **११४९५** |
| ५ | तंत्रज्ञ 'ब' हा यंत्रचालक पदी नियुक्तीवर दि. १०.०५.२०१८ रोजी रूजु झाल्यानंतर त्यास तंत्रज्ञ पदावर यापूर्वी दिलेल्या दोन अतिरिक्त वेतनवाढी काढून घेतल्यानंतर दि. २०.०४.२०१३ रोजीचे मूळवेतन | १००५० |
| ६ | दोन अतिरिक्त वेतनवाढी काढून घेतल्यानंतर दि. २०.०४.२०१८ रोजीचे मूळवेतन | ११०२५ |
| ७ | यंत्रचालक पदी दि. १०.०५.२०१८ रोजी झाल्यानंतर यंत्रचालक पदाच्या सुरूवातीच्या टप्प्यावर निश्चीत होणारे मूळवेतन | ११२७५ |
| ८ | सा.आ. क्र. १६६ (क) दि. २१.०७.२००५ नुसार **अधिक** दोन अतिरिक्त वेतनवाढी (रू. २७५+२७५) | ५५० |
| ९ | **यंत्रचालक पदी दि. १०.०५.२०१८ रोजी होणारी वेतननिश्चीती** | **११८२५** |

➢ **उदाहरण ३ : कर्मचारी 'क'** हा तंत्रज्ञ म्हणून दि. ०५.०५.२००८ रोजी सेवेत रूजू झाला आहे. तो यंत्रचालक पदी सरळसेवा भरती अंतर्गत नियुक्तीवर दि. २६.०७.२०१८ रोजी रुजू झाल्यानंतर त्याची वेतननिश्चीती खालीलप्रमाणे करण्यात येईल.

| अ.क्र. | तपशिल | मूळवेतन रू. |
|---|---|---|
| १ | दि. ०५.०५.२००८ रोजी तंत्रज्ञ पदावरील मूळवेतन<br>(दि. ०१.०४.२००८ च्या वेतन संरचनेतील जुन्या वेतनश्रेणीनुसार) | ८०४० |
| २ | सा.आ. क्र. १६६ (क) दि. २१.०७.२००५ नुसार **अधिक** दोन अतिरिक्त वेतनवाढी<br>(रू. १५५+१५५) | ३१० |
| ३ | दि. ०५.०५.२००८ रोजी तंत्रज्ञ पदावरील मूळवेतन | ८३५० |
| ४ | दि. ३१.०३.२०१३ रोजीचे तंत्रज्ञ पदाच्या वेतनश्रेणी नुसार मूळवेतन<br>(दि. ०१.०४.२००८ च्या वेतन संरचनेतील जुन्या वेतनश्रेणीनुसार) | ९००० |
| ५ | दि. ०१.०४.२०१३ रोजी तंत्रज्ञ पदाच्या वेतनश्रेणी नुसार मूळवेतन | ११२६० |
| ६ | **नियमित वेतनवाढी मिळाल्यानंतर दि. ०५.०५.२०१८ रोजीचे मूळवेतन** | **१२६७०** |
| ७ | तंत्रज्ञ 'क' हा यंत्रचालक पदी नियुक्तीवर दि. २६.०७.२०१८ रोजी रूजु झाल्यानंतर त्यास तंत्रज्ञ पदावर यापूर्वी दिलेल्या दोन अतिरिक्त वेतनवाढी काढून घेतल्यानंतर<br>दि. ०५.०५.२००८ रोजीचे मूळवेतन<br>(दि. ०१.०४.२००८ च्या वेतन संरचनेतील जुन्या वेतनश्रेणीनुसार) | ८०४० |
| ८ | दोन अतिरिक्त वेतनवाढी काढून घेतल्यानंतर दि. ३१.०३.२०१३ रोजीचे तंत्रज्ञ पदाच्या वेतनश्रेणी नुसार मूळवेतन<br>(दि. ०१.०४.२००८ च्या वेतन संरचनेतील जुन्या वेतनश्रेणीनुसार) | ८६६० |
| ९ | दोन अतिरिक्त वेतनवाढी काढून घेतल्यानंतर दि. ०१.०४.२०१३ रोजी तंत्रज्ञ पदाच्या वेतनश्रेणी नुसार मूळवेतन | १०८३० |
| १० | दोन अतिरिक्त वेतनवाढी काढून घेतल्यानंतर दि. ०५.०५.२०१८ रोजीचे मूळवेतन | १२२०० |
| ११ | यंत्रचालक पदी दि. २६.०७.२०१८ रोजी झाल्यानंतर यंत्रचालक पदी सेवाविनियम क्र २९(क) नुसार निश्चीत होणारे मूळवेतन | १२३७५ |
| १२ | सा.आ. क्र. १६६ (क) दि. २१.०७.२००५ नुसार **अधिक** दोन अतिरिक्त वेतनवाढी<br>(रू. २७५+३७०) | ६४५ |
| १३ | **यंत्रचालक पदी दि. २६.०७.२०१८ रोजी होणारे मूळवेतन** | **१३०२०** |

*****